

# प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे M.S., M.N.A.M.S.

# शिक्षणातील डॉक्टर

परिचय

**नाव : डॉ. गजानन र. एकबोटे**
**पद : कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे**
**जन्मतारीख : २९ एप्रिल १९५३**

'विद्या विनयेन शोभते असे म्हटले जाते, याची प्रचीती महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांच्याकडे पाहिल्यानंतर येते. पूर्व-प्राथमिक ते वरिष्ठ महाविद्यालये, व्यावसायिक महाविद्यालये तसेच अनेक विषयांतील संशोधन केंद्रे असलेल्या तब्बल ६० हून अधिक शिक्षणसंस्थांचे कार्याध्यक्ष म्हणून खंबीरपणे नेतृत्व सांभाळणारे प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांच्याकडे शिक्षण क्षेत्राबरोबरच वैद्यकीय क्षेत्रातही समरसून काम करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून पाहिले जाते. गोरगरीब आणि मध्यमवर्गीयांसाठी नेहमी आघाडीवर राहणाऱ्या आणि वयाच्या ७२व्या वर्षातही त्यांच्या कामाचा झपाटा पाहिल्यानंतर नकळत ...... 'तेथे कर माझे जुळती' याचा अनुभव आल्याशिवाय राहत नाही. अशा या सर्वगुणसंपन्न व नि:स्वार्थी व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला वेध....

भारत देश पारतंत्र्यात असताना ज्या काळात भारताला आधुनिकतेचा पुसटसाही स्पर्श झाला नव्हता, अशा काळात मा. कै. शंकरराव कानिटकर यांनी आपल्या शिक्षक सहकाऱ्यांच्या मदतीने प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेची स्थापना करून त्या छत्राखाली संस्थेच्या मॉडर्न हायस्कूलची स्थापना केली. अनेक शाळांची उभारणी केली. 'प्रोग्रेसिव्ह' म्हणजे 'प्रगतिशील' आणि 'मॉडर्न' म्हणजे 'आधुनिक'. विद्यार्थ्यांना प्रगतिशील आणि आधुनिक शिक्षण दिल्याशिवाय देशाचा भविष्यकाळ उज्ज्वल होणार नाही. त्यासाठी प्रयत्न करण्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या या संस्थेची सूत्रे ज्या वेळी त्याच संस्थेच्या शाळेत शिक्षणाचे धडे गिरवलेल्या प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांच्याकडे आली, त्या वेळी या संस्थेचा प्रगतीचा मार्ग मोकळा झाला, असे म्हणायला हरकत नाही.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीशी प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांचे नाते ४० वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून जोडले गेले आहे. तसे पाहायला गेले तर प्रा. डॉ. एकबोटे यांची ओळख पुण्यातील बी. जे. मेडिकल कॉलेज व ससून शासकीय रुग्णालयातील वरिष्ठ शल्यचिकित्सक व शल्यचिकित्सा विभागाचे प्रमुख प्राध्यापक म्हणून आहे. शिक्षणक्षेत्राचा कोणताही गंध नसलेल्या या व्यक्तीने प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या डोळे दिपविणाऱ्या



प्रगतीत सिंहाचा वाटा उचलला. त्याच वेळी आपल्या आवडत्या वैद्यकीय क्षेत्रातही त्यांनी अनेक चांगले डॉक्टर घडविले आपल्या हॉस्पिटलमार्फत तसेच ससून हॉस्पिटलमार्फत गोरगरिबांसाठी सातत्याने मदतीचा हात पुढे केला. १९८० सालापासून प्रोफेसर ऑफ सर्जरी म्हणून पुण्याच्या बी.जे. मेडिकल कॉलेजमध्ये कौशल्यप्रधान डॉक्टर घडविण्याचे काम त्यांनी केले. आजही ते 'गुणश्री प्राध्यापक' (Professor Emeritus) म्हणून पुण्याच्या बी.जे. मेडिकल कॉलेजमध्ये कार्यरत आहेत. शिक्षण आणि वैद्यकीय या दोन्ही क्षेत्रांत एवढी मोठी उंची गाठूनही प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांच्यामध्ये कोणताही अहंपणा दिसून येत नाही. अतिशय नम्र स्वभाव, अभ्यासूवृत्ती आणि मदतीसाठी नेहमीच तत्परता या गुणांमुळे त्यांचा जनमानसावरील प्रभाव दिसून येतो.

प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांची कौटुंबिक पार्श्वभूमी मध्यमवर्गीय कुटुंबातील म्हणता येईल. तरीही त्यांचे बालपण मजेत आणि सुखात गेले. त्यांचे वडील मा. कै. रमाकांत एकबोटे हे इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर होते. अतिशय कष्टाने त्यांनी पुण्यात व्यवसाय केला. ति. सौ. आई संसाराची जबाबदारी सांभाळत होती. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांना दोन लहान भाऊ आणि एक बहीण. डॉक्टरांचे पहिलीपासून अकरावीपर्यंतचे शिक्षण मॉडर्न हायस्कूलमध्येच झाले. त्यांना खेळात विशेषतः क्रिकेट, फुटबॉल आणि ॲथलेटिक्समध्ये खूप रस होता आणि आजही आहे. त्याशिवाय सांस्कृतिक कार्यक्रमांमध्येही ते सहभागी होत असत. ते निरनिराळ्या विषयांवर भाषणे करत असत. त्यांना अभ्यासातही गती उत्तम होती. गणित हा विषय त्यांच्या विशेष आवडीचा होता. या विषयात ते नेहमी पैकीच्या पैकी गुण मिळवित असत. वडिलांच्या मार्गावरून वाटचाल करण्याची प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांची तीव्र इच्छा होती. त्यांनाही इंजिनीअरच बनायचे होते. मात्र, वडिलांनी त्यांना वैद्यकीय क्षेत्रात जाण्याचा सल्ला दिला. वडिलांचा सल्ला शिरोधार्य मानून प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांनी आपला विचार बदलला. अकरावीच्या निकालानंतर वडिलांनी पुण्यातील प्रथितयश डॉक्टर के. एच. संचेती यांच्याशीत्यांची भेटही घालून दिली. डॉ. श्री. संचेती यांनीही देशाला चांगल्या डॉक्टरांची आवश्यकता असल्याचे नमूद करून वडिलांप्रमाणेच सल्ला दिला. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांनी बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस पूर्ण केले आणि पुन्हा वडिलांनी त्यांना सर्जन बनण्याचा सल्ला दिला. त्यानुसार त्यांनी एम. एस.ची प्रवेश परीक्षा दिली आणि त्याला प्रवेशही मिळाला. काही वर्षे दिल्लीतील एआयआयएमएस मध्ये सर्जरी या विषयाचे शिक्षण घेतले. त्यानंतर बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातून त्यांनी एम. एस. हे शिक्षण उत्तम गुणांनी पूर्ण केले.

एम.एस. झाल्यानंतर प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांनी लगेचच ऑक्टोबर, १९८० मध्ये बी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये पूर्णवेळ प्राध्यापक म्हणून कामाला सुरुवात केली. १९८५ साली वडिलांच्या सल्ल्यानुसार त्यांनी आठ बेडचे स्वतःचे नर्सिंग होम सुरू केले. स्वतःच्या प्रायव्हेट प्रॅक्टिसमुळे त्यांना बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाला पूर्णवेळ देता येत नसल्याने ते 'मानसेवी प्राध्यापक' म्हणून काम करू लागले. स्वतःच्या वैद्यकीय व्यवसायाला सुरुवात केल्यानंतर प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांनी खूप परिश्रम घेतले. दररोज अठरा ते वीस तास ते काम करायचे. सुरुवातीला कमी कर्मचारी असल्याने सर्व कामे ते स्वतःच करायचे. त्याशिवाय ससून रुग्णालयातही ते सेवा बजावत होते.

त्याच सुमारास म्हणजे १९८५ साली डिसेंबर महिन्यात प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाची निवडणूक झाली. अकरावीला गणित शिकविणाऱ्या मा. कै. मो. गो. चाफेकर सरांनी माजी विद्यार्थी म्हणून डॉक्टरांना निवडणुकीला उभे राहण्याचा आग्रह केला. त्या वेळी डॉक्टरांचा शिक्षणक्षेत्राशी सुतराम संबंध नव्हता. नुकतेच त्यांनी हॉस्पिटल सुरू केले होते. ससून हॉस्पिटलमध्ये तसेच बी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये

'मानसेवी प्राध्यापक' म्हणून ते कार्यरत होते. केवळ मा. कै. चाफेकर सरांच्या आग्रहास्तव ते निवडणूक रिंगणात उतरले. पुण्यातली एक नामांकित संस्था म्हणून या शैक्षणिक संस्थेचे नाव होते. त्या वेळी फार मोठा विस्तार नव्हता. केवळ आठ शाखा होत्या आणि साधारणपणे आठ हजारांपेक्षा कमी विद्यार्थिसंख्या होती. निवडणुकीच्या वेळी संस्थेवर १५ लाख रुपयांचा कर्जाचा बोजाही होता. संस्थेची परिस्थिती खूपच हलाखीची होती. गणेशखिंड येथील संस्थेच्या इमारतीचे बांधकामही रखडले होते. पैसे नसल्यामुळे कॉन्ट्रॅक्टरकाम सोडून गेला होता. संस्थेचे नाव मोठे असले तरी आर्थिकदृष्ट्या संस्था सक्षम नव्हती. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे आणि त्यांचे सहकारी या निवडणुकीत विजयी झाले. १ जानेवारी, १९८६ पासून संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य म्हणून त्यांनी कामाला सुरुवात केली. याला आज बरोबर ३९ वर्षे झाली. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांना हळूहळू या क्षेत्राचा अनुभव येत गेला. मा. कै. मो. गो. चाफेकर सरांनी त्यांना अनेक गोष्टी शिकविल्या.

फेब्रुवारी १९९० मध्ये पुणे विद्यापीठाच्या सिनेटची निवडणूक झाली. त्या वेळीही डॉक्टरांना निवडणूक लढविण्याचा आग्रह झाला. त्यांनी ही निवडणूकही लढवली. सर्वाधिक मताधिक्याने ते विजयीही झाले. लगेच एक महिन्यानंतर पुणे विद्यापीठाच्या कार्यकारिणीची निवडणूक झाली. लोकांनी पुन्हा आग्रह केला. मार्च १९९० मध्ये झालेल्या या निवडणुकीतही डॉक्टर प्रचंड मतांनी निवडून आले. शिक्षणक्षेत्रात डॉक्टरांचा फारसा संपर्क नव्हता. मात्र, पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात पुणे, नगर, नाशिक, धुळे, जळगाव या पाच जिल्ह्यांत त्यांचे अनेक माजी विद्यार्थी



होते. त्यांनी डॉक्टरांचा प्रचार केला. त्यांच्या माध्यमातून तसेच काही प्रमुख व्यक्ती यामध्ये पुण्याचे मा. कै. डॉ. श्रीपती शास्त्री, प्रा. डॉ. अनिरूद्ध देशपांडे, नाशिकचे मा. कै. डॉ. वसंतराव पवार, धुळ्याचे डॉ. भाईदास पाटील, कै. ॲड. माणिकराव पाटील, रा.स्व. संघ प्रांतचालक अशा व्यक्तींच्या सहकार्यामुळे व आशीर्वादामुळे ते प्रचंड मतांनी निवडून आले. त्यामुळे १९९० सालापासून डॉक्टरांचे उच्चशिक्षण क्षेत्रातील कार्य खऱ्या अर्थाने सुरू झाले.

शिक्षक व विद्यार्थ्यांच्या अडचणी, तसेच संस्था कशी वाढवावी याचे प्राथमिक ज्ञान त्यांना विद्यापीठात मिळाले. प्रा. डॉ. शिवाजीराव कदम आणि कै. डॉ. वसंतराव पवार हे त्यांचे दोन सहकारी मित्र यासाठी कारणीभूत ठरले. त्यांच्या कार्यातून डॉक्टर बरेच काही शिकले. स्वतःच्या संस्थेसाठी कसे काम करायचे, स्वतःची संस्था कशी वाढवायची, स्वतःच्या संस्थेची प्रगती कशी करायची या गोष्टींचे डॉक्टरांनी बारकाईने अवलोकन केले. डॉक्टरांनी दुसरे काम असे केले, की विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पाचही जिल्ह्यांतील प्रमुख संस्थांना मुद्दामहून वेळ काढून भेटी दिल्या. महाविद्यालयांना भेटी दिल्या. तेथील प्राचार्यांबरोबर चर्चा केल्या. त्यामुळे त्यांना नवनवीन गोष्टी शिकायला मिळाल्या आणि त्या स्वतःच्या संस्थेत राबविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्याचा फायदा असा झाला, की आज २०२५ मध्ये संस्थेची एकूण ६२ युनिट्स (शाखा) आहेत. ६० हजारहून अधिक विद्यार्थी या संस्थांमधून शिक्षण घेत आहेत आणि सुमारे चार हजार शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत. आठ युनिट्स, दहा हजार विद्यार्थी आणि ४०० शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांपासून सुरुवात करून आज डॉक्टरांनी संस्थेला प्रगतीच्या उच्च शिखरावर नेऊन बसविले आहे. प्रा. डॉ एकबोटे सरांनी आपल्या संस्थेत शिक्षणाचे बाजारीकरण होऊ दिले नाही. सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी त्यांची कायम धडपड होती आणि आजही आहे. प्रा. डॉ. एकबोटे यांनी संस्थेच्या सर्व शाळा, महाविद्यालयांतून गुणात्मक, कौशल्यपूर्ण व मूल्याधिष्ठित शिक्षण दिले जावे, यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन केले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी परिवाराचे प्रमुख म्हणून ते नेहमीच संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांची काळजी घेतात. कोरोनाच्या कठीण काळात त्यांनी संस्थेच्या अनेक कर्मचाऱ्यांची विशेष काळजी घेतली. त्यांच्यावरमोफत औषधोपचार केले.

प्रा. डॉ. एकबोटे हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या (पूर्वीचे पुणे विद्यापीठ) वैद्यक विद्याशाखेचे १० वर्षे अधिष्ठाता होते. तसेच विद्यापीठाच्या अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद याबरोबरच डॉ. एकबोटे यांनी विद्यापीठाच्या सर्व अधिकार मंडळांवर सदस्य म्हणून काम करून भरीव योगदान दिले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये डॉ एकबोटे यांनी अनेकवेळा विद्यापीठाचा अर्थसंकल्प मांडलेला आहे. पुणे विद्यापीठाचा, 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' असा नामविस्तार करताना डॉ. एकबोटे यांची अधिसभेतील भूमिका अतिशय महत्त्वाची होती. ही त्यांची भूमिका निर्णायक ठरली. या भूमिकेचे सर्वांनी स्वागत केले.

प्रा. डॉ. एकबोटे यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाचे 'प्रतिकुलगुरू' पद भूषविले आहे. या विद्यापीठाच्या सर्व अधिकार मंडळांवर त्यांनी काम केले आहे. आजही ते महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. डॉ. एकबोटे यांचे ८० हून



अधिक संशोधनपर शोधनिबंध निरनिराळ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाले आहे. त्यांचे वैद्यकीय व शैक्षणिक क्षेत्रातील सखोल ज्ञान व प्रसिद्ध झालेले शोधनिबंध यासाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक कडून त्यांना 'पीएच.डी. समकक्षत'' (Ph.D. equivalence) बहाल करण्यात आली आहे.

प्रा. डॉ. एकबोटे यांच्या विद्यापीठ कायद्याच्या सखोल अभ्यासाचा फायदा वेळोवेळी विद्यापीठ प्रशासनाला झाला आहे. भारतातील अनेक शैक्षणिक संस्थाना त्यांनी 'सल्लागार' म्हणून मार्गदर्शन केले आहे. नियोजन आयोग, भारत सरकार यांच्या उच्च शिक्षणाविषयीच्या समितीमध्ये त्यांनी सदस्य म्हणूने काम केले.

आज या संस्थेची वैद्यकीय महाविद्यालयाव्यतिरिक्त सर्व विद्याशाखांशी संबंधित महाविद्यालये आहेत. इंजिनीअरिंग, फार्मसी, मॅनेजमेंट, लॉ, एज्युकेशन, फिजिओथेरपी, अॅग्रीकल्चर, बायोटेक्नॉलॉजी यांचा त्यामध्ये समावेश आहे. त्यामुळे संस्थेचा केवळ संख्यात्मक विकास नाही, तर गुणात्मकविकासही झालेला आहे. संस्थेच्या सर्व महाविद्यालयांना केंद्रीय संस्थेकडून चांगले नामांकन मिळाले आहे. शिवाजीनगरच्या मॉडर्न महाविद्यालयाला नॅकने 'अ+' श्रेणी दिली आहे. गणेशखिंड येथील मॉडर्न कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाला पुणे विद्यापीठाने 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' म्हणून गौरविले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने या महाविद्यालयाला 'कॉलेज विथ पोटेन्शियल फॉर एक्सलन्स' हा दर्जासुद्धा दिला आहे. गणेशखिंडमधील मॉडर्न महाविद्यालयाला सुद्धा हे सर्व पुरस्कार मिळाले आहेत. 'अ' श्रेणी, स्टार महाविद्यालय स्टेटस, 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार यासाठी गणेशखिंड येथील मॉडर्न कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची निवड झाली आहे. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी संचालित अनेक महाविद्यालयांच्या प्राचार्यांना 'सर्वोत्कृष्ट प्राचार्य' या पुरस्काराने पुणे विद्यापीठाकडून गौरविण्यात आले आहे. मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग तसेच मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी, निगडी, पुणे या संस्थेच्या महाविद्यालयांना 'उत्कृष्ट व्यावसायिक महाविद्यालय'

''शिक्षणसंस्थांचे काम करणे म्हणचे एक प्रकारची देशसेवाच आहे,'' असे प्रा. डॉ. एकबोटे यांचे मत आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडविण्याचे काम केले जाते. नवीन पिढी घडविण्याचे काम केले जाते. अनेक लोकांचा गैरसमज आहे, की शिक्षण संस्था म्हणजे पैसे उकळण्याचे साधन आहे. परंतु, डॉक्टर एकबोटे तसे मानत नाहीत. डॉक्टरांचा चरितार्थ काही संस्थेवर अवलंबून नाही. त्यासाठी त्यांचे स्वतःचे हॉस्पिटल आहे. संस्थेला मिळणारा सर्व निधी संस्थेच्या विकासासाठीच वापरला जातो, हे संस्थेच्ये वैशिष्ठ्य आहे. नियामक मंडळातील सर्व सहकाऱ्यांनी निःस्वार्थी वृत्तीने काम केल्यामुळेच संस्थेचा सर्वांगीण विकास करणे शक्य झाल्याचे ते आवर्जून सांगतात. संस्थेच्या माध्यमातून डॉक्टरांनी संपत्ती जमवली, असे त्यांचे शत्रूही कधी म्हणणार नाहीत, असे त्यांचे सहकारी सांगतात.प्रा. डॉ. एकबोटे यांनी संस्थेच्या प्रशासनासाठी एक नवीन, पारदर्शक, स्वच्छ कार्यप्रणाली विकसित केली आहे.

म्हणून पुरस्कार मिळाला आहे. शिवाजीनगर येथील मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग या महाविद्यालयाला नॅकने 'अ++' श्रेणी दिली आहे.

शाळांच्या प्रगतीच्या बाबतीतही संस्था पिछाडीवर नाही. मार्च २०२५ मध्ये झालेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या शालान्त परीक्षेत सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे निकाल शंभर टक्के लागले आहेत. यातील दोन माध्यमिक शाळांचा निकाल तर गेली सलग तीस वर्षे शंभर टक्के लागत आहे. अनेक विद्यार्थ्यांना नव्वद टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळतात. गुणवत्तेच्या बाबतीत संस्था नेहमीच आघाडीवर राहिली आहे. क्रीडा क्षेत्रातही संस्थेच्या विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. संस्थेच्या पन्नास विद्यार्थ्यांना राज्य क्रीडा क्षेत्रातील 'शिवछत्रपती' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला आहे. तीन विद्यार्थ्यांना अर्जुन पुरस्कारही मिळालेला आहे. संस्थेच्या शिवाजीनगर येथील मॉडर्न कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाला सलग आठव्यांदा 'उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय' हा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला आहे. नुकताच केंद्रीय मंत्री मा. श्री नितीनजी गडकरी यांच्या हस्ते संस्थेतील प्राचार्य, मुख्याध्यापक व संशोधकांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी मा. श्री नितीनजी गडकरी यांनी संस्थेच्या प्रगतीबद्दल गौरवोद्गार काढले. संस्था संचालित शाळेतील नववीतील अनेक विद्यार्थ्यांच्या विज्ञान प्रयोगाला राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळाला आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांना चालना देण्याचे काम संस्थेमार्फत केले जाते.

संस्थेच्या कारभारावर त्यांचे बारीक लक्ष असते. संस्थेत होणाऱ्या नियुक्त्यांमध्ये कोणताही भ्रष्टाचार खपवून घेतला जात नाही. अनेक संस्थांमध्ये शिक्षक, शिपाई पदाच्या भरतीतही लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची उदाहरणे ऐकायला मिळतात. आपल्या संस्थेत प्रवेश देतानाही कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार होणार नाही, याची ते काळजी घेतात. संस्थेची अनेक बांधकामे सुरू आहेत. त्यासाठी कॉन्ट्रॅक्टर निवडण्याची पद्धतही त्यांनी अतिशय पारदर्शक ठेवली आहे. सगळ्यांना विश्वासात घेऊन ही कामे केली जातात. या तिन्ही गोष्टींबरोबरच चारित्र्य जपल्यामुळे संस्थेविषयी तसेच संस्थाचालकांविषयी सामान्य माणसांत तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये मोठा विश्वास निर्माण झाला आहे, आदर निर्माण झाला आहे. डॉक्टरांच्या मते, कोट्यवधी रुपयांच्या संपत्तीपेक्षाही ही संपत्ती फार मोठी आहे. आई-वडील, तसेच गुरुजनांचे संस्कार यासाठी कारणीभूत आहेत. माणूस कितीही शिकला, तरी त्याचे मूळ संस्कार चांगले असतील तर त्यामधून उत्तम घडू शकते, हे प्रा. डॉ. ग.र. एकबोटे यांच्या उदाहरणावरून लक्षात येते.

संस्थेचे कामकाज करताना चांगल्या दर्जाचे शिक्षण मुलांना मिळाले पाहिजे, असा डॉक्टरांचा प्रयत्न असतो. डॉक्टरांनी एक तत्त्व ठरवलेय, की माझी शिक्षण संस्था ही गोरगरीब आणि मध्यमवर्गीयांना परवडणारी असेल. संस्थेने अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनाचे सोने केलेले आहे. गेल्या ९१ वर्षांची ही वाटचाल आहे. १९३४ साली मा. कै. शंकरराव कानिटकरांनी संस्थेची सुरुवात केली. त्या वेळी संस्थेचे नाव 'प्रोग्रेसिव्ह' आणि पहिल्या शाळेचे नाव 'मॉडर्न' ठेवले. 'प्रोग्रेसिव्ह' याचा अर्थ प्रगतिशील असलेला आणि नावीन्याचा ध्यास घेणे. १९३४ साली हा विचार मांडला गेला, की आपली संस्था प्रोग्रेसिव्ह आणि मॉडर्न असावी. त्या वेळचा विचार अजूनही कायम आहे, की शिक्षण कसे असावे तर प्रोग्रेसिव्ह आणि शाळा/महाविद्यालये मॉडर्न असावे. 'मॉडर्न' म्हणजे आधुनिकतेची कास धरणारी. म्हणजे अत्याधुनिक उपकरणे, शिकवण्याची अत्याधुनिक साधने, अत्याधुनिक प्रयोगशाळा, अत्याधुनिक ग्रंथालय. आज संस्थेच्या कोणत्याही शाळा किंवा महाविद्यालयात जाऊन पाहिले तर डॉक्टरांच्या कार्यशैलीमुळे त्या ठिकाणी प्रगती आणि आधुनिकता यांचा मिलाफ पाहायला मिळेल.

शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयामध्ये संस्थेने अनेक नवीन प्रयोग राबविले आहेत. त्या ठिकाणी डिजिटल क्लासरुम्स् आहेत. व्हर्चुअल क्लासरुम्स् आहेत, एखादे चांगले व्याख्यान असेल तर सर्व विद्यार्थ्यांना संस्थेच्या सभागृहामध्ये बसवून ऐकवले जाते. संस्थेचे सर्व रेकॉर्ड्स डिजिटल केलेले आहेत. विद्यार्थ्यांसाठी खेळीमेळीचे आणि मित्रत्वाचे वातावरण तयार केले जाते. विद्यार्थ्याला कोणतेही प्रमाणपत्र किंवा कागदपत्रे चार दिवसांत उपलब्धहोतील, याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि पालक यांचा यंत्रणेवरील विश्वास कायम राहिला आहे. संस्थेचे कामकाज विद्यार्थिभिमुख असल्याचे त्यांना वाटते. महाराष्ट्रातील एक नामांकित संस्था म्हणून समाजात, तसेच शिक्षण क्षेत्रात या संस्थेचा नावलौकिक निर्माण झाल्याने डॉक्टरांना समाधान वाटते. मात्र, याचे श्रेय ते स्वतः घेत नाहीत. यासाठी सांघिक काम कारणीभूत आहे. नियामक मंडळाचे सहकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी खांद्याला खांदा लावून काम करत असल्यामुळे

हा 'जगन्नाथाचा रथ' ओढला जात आहे. त्यामुळे हे यश मिळाले आहे, असे ते नम्रपणे नमूद करतात.

डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या शाळा, महाविद्यालयांमध्ये सातत्याने नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू असतात. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देण्याऐवजी त्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल, या दृष्टिकोनातून सातत्याने प्रयत्न सुरू असतात. चांगला माणूस घडविण्यावर लक्ष केंद्रित केले जाते. क्रीडा, सांस्कृतिक वसामाजिक क्षेत्रातील ज्ञान घेणारा एक परिपूर्ण विद्यार्थी घडविणे हे उद्दिष्ट बाळगून डॉक्टरांची संस्था कार्यरत आहे. यामध्ये भरघोस यश संस्थेला मिळालेले आहे. अर्थात, हा प्रवास वाटतो तितका सोपा नाही. अतिशय खडतर आहे. संस्थेसाठी निधी उभा करणे, सगळ्या सहकाऱ्यांना बरोबर घेऊन वाटचाल करणे यावर मेहनत घ्यावी लागते आणि डॉक्टर वयाच्या ७२ व्या वर्षीही दिवसातून किमान सोळा तास हे काम अतिशय उत्साहाने आणि आनंदाने करतात.

डॉक्टरांच्या पत्नी प्रा. डॉ. सौ. ज्योत्स्ना ग. एकबोटे या फर्ग्युसन महाविद्यालयामधून प्राध्यापक म्हणून निवृत्त झाल्या आहेत. सुमारे ३८ वर्षे त्यांनी अध्यापन केले आणि संसाराची जबाबदारीही उत्तमप्रकारे सांभाळली. त्यासुद्धा आता प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीशी जोडलेल्या आहेत. संस्थेच्या सहकार्यवाह म्हणून त्या काम पाहतात. संस्थेच्या शाळा-महाविद्यालयांच्या समित्यांवर त्या अध्यक्षा म्हणून काम पाहत आहेत. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर प्रा. डॉ. सौ. ज्योत्स्ना यांनी मोलाची साथ दिल्यामुळेच मी इथपर्यंत येऊन पोहोचलो आहे, असे डॉक्टर अभिमानाने सांगतात. प्रा. सौ. ज्योत्स्ना मूळच्या नाशिक जिल्ह्यातील मालेगावच्या.

भविष्यात संस्थेचे वैद्यकीय महाविद्यालय काढण्याचे डॉक्टरांचे स्वप्न आहे. त्यासाठी पौड येथे ५१ एकर जागाही घेऊन ठेवली आहे. दुसरे म्हणजे डॉक्टरांना संस्थेचे स्वतःचे अभिमत विद्यापीठ अर्थात 'मॉडर्न युनिव्हर्सिटी' निर्माण करायचे आहे. संस्था संचालित सात महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून 'स्वायत्त' दर्जा प्राप्त झाला आहे. संस्थेच्या सर्वच महाविद्यालयांना स्वायत्त महाविद्यालयांचा दर्जा मिळवण्यासाठी प्रा. डॉ. एकबोटे प्रयत्न करीत आहेत. त्याचप्रमाणे स्वायत्त महाविद्यालयांचा दर्जा हा महाविद्यालयांपुरताच मर्यादित राहू नये, तर चांगल्या शाळांनाही तो दिला पाहिजे, यासाठी प्रा. डॉ. एकबोटे यांनी शासनाकडे एक योजनाही मांडली आहे. स्वायत्त दर्जा मिळाल्यानंतर महाविद्यालये आणि शाळांना स्वतःचा अभ्यासक्रम तसेच परीक्षा पद्धती स्वतंत्रपणे ठरवता येते.

१९७८ साली फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापिका म्हणून रुजू झालेल्या प्रा. डॉ. ज्योत्स्ना २०१५ साली सेवानिवृत्त झाल्या. डॉक्टरांबरोबर १९८२ साली त्यांचा विवाह झाला. प्रा. डॉ. सौ. एकबोटे या २०१७-२०२२ या कालावधीत पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका म्हणून कार्यरत होत्या. या निवडणुकीत त्या सर्वाधिक मताधिक्याने निवडून आल्या होत्या. पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून त्यांनी सामान्य जनतेसाठी अनेक उपक्रम राबविले तसेच कोरोना काळात गोरगरीब जनतेला मदत केली. पुण्यात शिक्षणासाठी राहणाऱ्या अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनींना त्यांच्या मूळ गावी जाण्यासाठी त्यांनीमदत केली. आजमितीस प्रा. डॉ. सौ. एकबोटे या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद व अधिसभेच्या सदस्या आहेत.

या दांपत्याची मोठी मुलगी प्रा. डॉ. निवेदिता या बी.इ., एम. बी. ए., एम.ए. आहेत. तसेच त्यांनी पीएच.डी.ही पूर्ण केली आहे. मॉडर्न इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट ही शाखा त्यांनी सुरू केली आहे. या शाखेमध्ये त्या असोसिएट प्रोफेसरही आहेत. संस्थेच्या उपकार्यवाहपदाची जबाबदारी त्या सक्षमपणे पार पाडत आहेत. डॉ. गायत्री या प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांची दुसरी कन्या D.N.B. (Rheumatology) झाल्या असून, सध्या ती पुण्यातील सुप्रसिद्ध दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये कार्यरत आहे. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांचे चिरंजीव डॉ. दिग्विजय हे लखनऊ येथील किंग जॉर्ज मेडिकल विद्यापीठामधून D.M. (Rheumatology) या सुपर स्पेशालिटी अभ्यासक्रमाचे शिक्षण पूर्ण करून आता पुणे व नाशिक येथे संधिवाताच्या अनेक रुग्णांना उपचार देत आहेत. पुण्यातील डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयात ते अध्यापनाचे कार्य करीत आहेत. तसेच संस्थेचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. असे हे सुसंस्कारित कुटुंब शिक्षण, सामाजिक आणि वैद्यकीय क्षेत्रातील आपल्या योगदानाद्वारे समाजसेवा करण्याचे कार्य करीत आहे. त्यांना भविष्यकाळातही असेच काम करण्यात यश मिळावे, यासाठी श्री परमेश्वर चरणी प्रार्थना व शुभेच्छा! ■